## राज्यशास्त्र विभाग

## अहवाल (2020–21)

### 1. अभिरुप युवा संसद स्पर्धाः

युवा बिरादरी (भारत) या संस्थेच्या वतीने अमरावती येथे दि. 5 जानेवारी 2021 रोजी विभागीय स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत महाविद्यालयाचे टिमने 5000 रु चे बक्षिस प्राप्त केले.

### 2. संविधान दिनः

संविधान दिनाचे आयोजन 26 नोव्हेंबर 2020 रोजी केले. यावेळी राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. जे. जे. जाधव यांन मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य, डॉ. अनिल गारोडे हे होते. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

### 3. मानवी हक्क दिनः

10 डिसेंबर 2020 रोजी जागतिक मानवी हक्क दिन राजरा करण्यात आला. प्रा. डॉ. जे. जे. जाधव यांनी मानवी हक्काचा इतिहास, स्वरुप व अर्थ यावर प्रकाश टाकला. अध्यक्षस्थानी प्राचार्य, डॉ. अनिल गारोडे हे हाते. कार्यक्रमास प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

### 4. राष्ट्रीय मतदार दिनः

दि. 25 जानेवारी 2021 रोजी विभागाच्या वतीने राष्ट्रीय मतदार दिनाचे आयोजन करण्यात आले. विभाग प्रमुख प्रा. डॉ. जे. जे. जाधव, प्राचार्य, डॉ. अनिल गारोडे, नॅक समन्वयक प्रो. डॉ. वनिता पोच्छी यांनी लोकशाहीत मतदानाचे महत्व याविषयी मार्गदर्शन केले. संचालन डॉ. सुनिता कलाखे तर आभार डॉ. विष्णु पडवाल यांनी केले.

### 5. संशोधन पध्दती कार्यशाळाः

राज्यशास्त्र विभाग व पीएच.डी सेलच्या वतीने दि. 15 सप्टेंबर 2021 रोजी संशोधन पध्दती या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली. मार्गदर्शक म्हणून राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष तथा विद्यापीठ आरसीसी समिती सदस्य प्राचार्य, डॉ. सुभाष गवई हे लाभले. अध्यक्षस्थानी प्राचार्य, डॉ. ओमराज देशमुख तर प्रमुख अतिथी म्हणुन नॅक समन्वयक प्रो. डॉ. वनिता पोच्छी, पीएच.डी सेलचे प्रमुख डॉ. जुक्कलकर, प्रा.डॉ. जे. जे. जाधव हे होते.

या कार्यशाळेचा लाभ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी, पदव्युत्तर वर्गाचे विद्यार्थी तसेच आभासी पध्दतीने प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

### 6. निवडणुक साक्षरता मंडळाची स्थापनाः

महाविद्यालयात प्राचार्य, डॉ. ओमराज देशमुख यांच्या मार्गदर्शनात राज्यशास्त्र विभागाच्या वतीने व शासनाच्या निर्देशाने दि. 12 ऑगष्ट 2021 रोजी निवडणुक साक्षरता मंडळाची स्थापना करण्यात आली. यासाठी विविध वर्गातुन साक्षरता मंडळाची कार्यकारीणी गठीत करण्यात आली. हे मंडळ मतदार नोंदणी तसेच मतदान जागृतीचे कार्य करणार आहे.

7. सामान्य ज्ञान स्पर्धा:

राज्यशास्त्र अध्ययन व संशोधन मंच जि. बुलडाणा यांच्या वतीने सामान्य ज्ञान स्पर्धा आयोजित करण्यात आली. यात राज्यशास्त्र विभागाच्या 70 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. दत्तात्रय गाढवे व सौरभ शिंदे हे दोन विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकविला.

8. सेट परिक्षा उत्तीर्ण:

एम.ए. राज्यशास्त्र विभागातील 1. विजय समाधान चांदणे 2.अक्षय संजय वाकोडे हे विद्यार्थी महाराष्ट्र शासनाची प्राध्यापक पात्रता परिक्षा सेट उत्तीर्ण झाले.

राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. जे. जे. जाधव व प्राचार्य, डॉ. ओमराज देशमुख यांनी त्यांचे अभिनंदन केले.